International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# जैत रे जैत : आदिवासी जीवनावर आधारित महत्त्वपूर्ण कलाकृती (कादंबरी व चित्रपट)

**कु. चैताली धनंजय देशपांडे**
*संशोधक,*
*बलभीम महाविद्यालय, बीड*
*Corresponding Author – कु. चैताली धनंजय देशपांडे*
**DOI - 10.5281/zenodo.17663438**

**प्रस्तावना:**

मराठी साहित्य विश्वात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही ठळक वाङ्मयप्रवाह दिसून आले, त्यातील एक महत्त्वपूर्ण प्रवाह म्हणजे आदिवासी साहित्य. आदिवासी समाज हा पारंपरिक, आदिम जीवनशैलीतला, अनेक लोकभ्रम, रूढी आणि परंपरांमुळे त्यांच्या जीवनशैलीत गूढता दिसून येते. ही गूढता आदिवासींच्या आयुष्याविषयी लोकांमध्ये जिज्ञासा आणि उत्सुकता निर्माण करते.

दळणवळण आणि संशोधनामुळे आदिवासी जीवन जवळून समजण्याची संधी मिळाल्याने आदिवासी जीवनाशी संबंधित विविध साहित्यिकांनी आदिम जीवनाच्या वेदना, संघर्ष, आणि संस्कृती यांचे प्रभावी चित्रण केले. या साहित्याने पारंपरिक साहित्याचा पायंडा मोडत आदिवासी जीवनाची खरी ओळख उभी केली. यामध्ये ‘गोदाराणी’, ‘पाणकळा’, ‘हाकुमी’, ‘एका नक्षलवाद्याचा जन्म’, ‘जेव्हा माणूस जागा होतो’, ‘एकलव्य’, ‘डांगाणी’ यांसारख्या महत्त्वाच्या कलाकृतींचा समावेश आहे. ठाकर आदिवासी समाजाच्या वेदना, संघर्ष व संस्कृती यांचे वर्णन करणारी गो. नी. दांडेकरांची 'जैत रे जैत' कादंबरी ही त्यापैकीच एक. १९६५ साली आलेली ही कादंबरी पुढे १९७७ साली चित्रपटस्वरूपात प्रेक्षकांसमोर आली. 'जैत रे जैत' मराठी सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरेत आपलं एक आगळं महत्त्व राखून आहे.

**पार्श्वभूमी:**

महाराष्ट्रातील विविध गडांना, स्थळांना भेटी देताना काही माणसे गोनीदां (लेखक गोपाळ नीलकंठ दांडेकर) यांना भेटली, ती त्यांच्या कथा - कादंबऱ्यांचा भाग ठरली. 'जैत रे जैत' कादंबरीचा नायक 'नाग्या' हाही तसाच भेटला. सह्याद्रीच्या कडेकपारीतला, अजून तेथे नव्या जगाची पावले उमटलेली नाहीत अशा कर्नाळा किल्ल्याच्या परिसरात राहणाऱ्या ठाकर समाजातील ठाकरवाडी गावातला ढोल वाजवणारा नाग्या भगत, त्याच्या पाप पुण्याच्या संकल्पना, लिंगोबाचा डोंगर, भात जमिनीत राबणारे लोक त्यांचे रीतिरिवाज, परंपरा, भावभावना, श्रद्धा - अंधश्रद्धा आणि ऋतुचक्रावर चालणारे त्यांचे संघर्षमय जीवन यांचे चित्रण त्यांनी या कादंबरीत केले. ठाकर समाजाचा निसर्गाशी जीवाभावाचा संबंध, तिथल्या धार्मिक श्रद्धा आणि

कुटुंबातील भावनांचे गुंफण या कादंबरी-कथेच्या केंद्रस्थानी आहे.

**कथानक:**

प्रथमदर्शनी ही कथा नाग्या - चिंधीची प्रेमकथा वाटते पण ती तितकीच मर्यादित राहत नाही. नाग्या उत्तम ढोल वाजवतो, तो कलावंत आहे, तो भगत आहे, त्याला पुण्यवंत व्हायचं आहे, आयुष्यात जिंकायचं आहे, 'जैत' मिळवायची आहे, त्यासाठी त्याचा संघर्ष आहे.

चिंधीचा संघर्षही साधा नाही, आदिवासी, अप्रगत अशा जमातीत, जिथे अजुन स्त्रीशिक्षण वगैरे अशा अवजड शब्दांचा प्रवेशही झाला नसेल तिथे ती स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करताना दिसते, स्वतःचे निर्णय स्वतः घेताना दिसते. ढोल वाजवणारा नाग्या आपल्याला आवडला म्हणून आपल्या बुळ्या, भित्र्या अशा नवऱ्याला सोडण्याचा विचार करते. त्यासाठी त्याला काही रक्कमही देते आणि काडीमोड घेते. पुढे नाग्याच्या घरी जावून, त्याच्या घरच्या कुटुंबीयांकडून लग्नाची परवानगी मिळवते व लग्न करते.

नाग्याची पुण्यवंत होण्याची, राणीमाशीला पाहण्याची धडपड चालूच असते, त्यात तो त्याचा एक डोळा गमावतो, पुढे त्याची 'जैत' म्हणजे विजय होतो कि नाही, याचा खुलासा कादंबरीच्या शेवटी होतो.

थोडक्यात ही कथा ठाकर समाजाच्या जीवन जाणिवा समजून घेऊन, त्यांच्या संस्कृतीविषयी, त्यांच्या श्रद्धांविषयी, अंधश्रद्धांविषयी, परंपरांविषयी, जीवन मुल्याविषयी भाष्य करते. लिंगोबाचा डोंगर, भातशेती, जांभळाची झाडे, मधमाश्या व त्यांची पोळी यांचा कथानकात ठिकठिकाणी येणारा उल्लेख आदिवासी समाजाच्या निसर्गासोबतच्या नात्याला ठळकपणे दर्शवतो.

**जैत रे जैत चित्रपट:**

मंगेशकर कुटुंबीयांनी 'महालक्ष्मी चित्र' या निर्मितीसंस्थेद्वारे, डॉ. जब्बार पटेल यांच्या दिग्दर्शनात या चित्रपटाची निर्मिती केली. स्मिता पाटील (चिंधी), डॉ. मोहन आगाशे (नाग्या), निळू फुले व सुलभा देशपांडे (नाग्याचे आई - वडील) अशा कलाकारांच्या अभिनयाने गोनीदांच्या कथेतली पात्रे जिवंत झाली.

या चित्रपटाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटातील संगीत, गाणी. पं. हृदयनाथ मंगेशकरांचा संगीत, लता मंगेशकर, उषा मंगेशकर, आशा भोसले, रवींद्र साठे या गायकांचे गीतगायन व निसर्गकवी ना. धों. महानोरांचे शब्द असा सुरेख संगम आजही लोकांच्या मनावर गारुड आहे, म्हणूनच मराठीतील एक उत्तम संगीतक म्हणून या चित्रपटाची गणना होते. पटकथेत विविध ठिकाणी गाण्याचा, संगीताचा उत्तम वापर करत नाग्याची कथा प्रेक्षकांना सांगितली जाते.

'आम्ही ठाकर ठाकर या रानाची पाखरं
या झांबऱ्या गर्दीत मांडून इवले घर'

असं ऐकू येताच किल्ल्याच्या पायथ्याशी असणारी इवली इवली घरे दिसू लागतात, ठाकरवाडी, जांभूळ पिकले झाड, उतरू आलेले नभ डोळे बंद असतानाही चित्रपटातील गाणी ऐकताना दिसू लागतात. 'मी रात टाकली, मी कात टाकली' या गीतात लता मंगेशकरांचा आवाज आणि स्मिता पाटील यांचा पडद्यावरचा वावर या गीताला अविस्मरणीय ठरवतो.

१९७८ सालच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 'जैत रे जैत' चित्रपटाला 'रजतपदक' लाभले. सोबत स्मिता पाटील व डॉ. जब्बार पटेल यांनाही विशेष पुरस्कार मिळाले. त्याकाळी व्यावहारिकदृष्ट्या फार यश नसलेला हा चित्रपट आज मराठी चित्रपटसृष्टीतील मानाचे पान म्हणून पाहिला जातो.

**ठाकर समाजाची आजची परिस्थिती:**

ठाकर आदिवासी समाज महाराष्ट्रातील रायगड, ठाणे, पालघर आणि पुणे जिल्ह्यांत वसलेला एक महत्त्वाचा समूह आहे, जो पारंपरिकपणे ढोलवादन, लाकूड कापणी आणि हस्तकलेवर अवलंबून आहे. महाराष्ट्र शासनाने ठाकरांसाठी विविध विकास योजना राबवल्या असूनही वनाधिकार आणि जमीनसंबंधी अडथळे अनेक ठिकाणी आहेत, ज्यामुळे अनेक कुटुंबं भूमिहीन आहेत. शिक्षणात सुधारणा असूनही ग्रामीण भागातील युवकांना उच्च शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्य मिळवण्यात अडचणी आहेत; रोजगाराच्या संधीही मर्यादित आहेत. ठाकर समाजाने आपल्या लोकपरंपरा, नृत्य, लोकगाणी आणि सांस्कृतिक सण जपण्यासाठी प्रयत्न केले असले तरी, शहरीकरण आणि सामाजिक बदलांमुळे सांस्कृतिक टिकाव धोक्यात आलेला आहे. आरोग्य सेवा सुधारत असून जनजागृती मोहिमा राबवल्या जात आहेत, पण दुर्गम भागातील आरोग्य सुविधा अजून अपुरी आहेत. आश्रमशाळा आणि एकलव्य मॉडेलमुळे आदिवासी बालकांच्या शिक्षणातील प्रगती होत आहे.

ठाकर समाजाचा निसर्गाशी वैयक्तिक संबंध असून पर्यावरणीय धोके आणि वनांच्या कापणीमुळे जैवविविधतेला धोका आहे. महिला सशक्तीकरणासाठी ठाकर समाजातील महिलांनी स्वयंसेवी संघटना व जागरूकता मोहिमा राबवल्या असून आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी ते वाटचाल करत आहेत. एकंदरीत, सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय व सांस्कृतिक अडचणी असूनही ठाकर समाज विकासाच्या मार्गावर आहे, तरीही अधिक धोरणात्मक पाठिंबा आणि जनजागृतीची गरज आहे.

**समारोप:**

“जैत रे जैत” केवळ समाजचित्रे किंवा आदिवासी जीवनाचा दस्तावेज नाही तर ती ठाकर समाजाच्या निष्ठा आणि संघर्षालाही मानवीरुप देते. ही कादंबरी व त्याचे चित्रपट रूपांतरण मराठी वाङ्मय आणि सिनेमात एक अमूल्य ठेवा आहे, जे आदिवासी अस्मिता, संस्कृती आणि संघर्षाचे सशक्त प्रतिनिधित्व करते. ही कलाकृती समाज-राजकीय आणि सांस्कृतिक संदर्भात आजही मराठी समाजासाठी अभ्यासाचे आणि संवेदनांचे केंद्र आहे.

**संदर्भसूची:**

१) दांडेकर, गोपाळ नीलकंठ - जैत रे जैत (१९६५), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

२) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (एम. ए. भाग १ मराठी), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३) मराठी वाङ्मयीन चळवळींचा अभ्यास (एम. ए. भाग १ मराठी), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

४) जैत रे जैत : Wikipedia संकेतस्थळावरील पाने

५) YouTube संकेतस्थळावरील 'जैत रे जैत' चित्रपटाविषयीचे व्हिडीओ, मुलाखती

६) आठवणीतील गाणी (संकेतस्थळ)

७) साप्ताहिक साधना (Archives)

८) विकासपीडिया (संकेतस्थळ)